जावक क्र. ९८३३/२०२१
धर्मादाय आयुक्त भवन,
३ रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४, २४९३५४९०
दिनांक- २७/०८/२०२१

# परिपत्रक क्रमांक ५८६/२०२१ दि. २७/०८/२०२१

पहा-१. सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२१/१५) सहा. दि. २६.१०.२०१५

२. सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र./क्र. (२६८/१५) सहा. दि. १९.१२.२०१५

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्राकान्वये दिलेल्या निर्देशानुसार धर्मादाय संघटनेतील सर्व अधिनस्त कार्यालयाला या परिपत्राकानुसार निर्देश देण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविणाऱ्या अर्जदारांनी मागणी केलेली माहिती मुदतीत व अभिलेख स्वरूपात परिपूर्ण, मुद्देसूद, सुटसुटीत व सोप्या भाषेत उपलब्ध करून द्यावी माहिती उपलब्ध करून देताना त्यामध्ये कोणकोणत्या बाबी समाविष्ट असाव्यात याबाबत स्पष्टता करणेकामी महाराष्ट्र शासनाने उपरोक्त तसेच वेळोवेळी शासन निर्णय किंवा परिपत्रक निर्गमित केले आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

तसेच, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दिल्या जाणाऱ्या माहितीच्या प्रमाणित प्रतींवर योग्य ठिकाणी, योग्य रीतीने माहिती अधिकाराचा शिक्का उमटवण्यात यावा. जेणेकरून अर्जदाराला सदर माहितीचे योग्य रीतीने वाचन करता येईल याची दक्षता जनमाहिती अधिकारी यांनी घ्यावी.

तसेच, माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील तरतुदींचे काटेकोर पालन न करणाऱ्या जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची या कार्यालयाकडून गांभीर्याने दखल घेतली जाईल.

सदर, परिपत्रक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांच्या व सर्व संबंधितांच्या निर्देशनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.

(प्र. श्रा. तरारे)
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१. सर्व धर्मादाय सह आयुक्त
२. सर्व धर्मादाय उप आयुक्त
३. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
४. कार्यालयीन परिपत्रक धारिणी
५.संगणक शाखा (संकेतस्थळावर नोंदीसाठी)